महाराष्ट्र शासन
पर्यावरण विभाग
शासन निर्णय क्र.इएनव्ही-२०१०/प्र.क्र.५१/तां.क.३
मंत्रालय, मुंबई- ४०००३२
दिनांक: ३१ जानेवारी २०१२

वाचा : (१) या विभागाचा शासन निर्णय क्र.योजना-२००७/प्र. क्र.३४/तां.क.३, दिनांक ३ ऑक्टोबर, २०११

(२) क्र. इएनव्ही-२०११/प्र.क्र. ११२/तां.क. ३, दिनांक ३ ऑक्टोबर, २०११ रोजीचे सुकाणू समितीच्या बैठकीचे इतिवृत्त.

(३) या विभागाचा शासन निर्णय क्र.योजना-२००७/प्र. क्र.३४/तां.क.३, दिनांक ३ ऑक्टोबर, २०११

(४) जीवन आशा वेलफ़ेअर सोसायटी संस्थेचे दिनांक ७ डिसेंबर २०११ रोजीचे पत्र

**प्रस्तावना :**

पर्यावरण संवर्धनार्थ राज्याच्या स्थानिक गरजा लक्षात घेवून लोकसहभागातून नाविन्यपूर्ण कार्यक्रम राबविण्यासाठी पर्यावरण विभागामार्फत सन २०१०-२०११ पासून **Call for Green Ideas** कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. या अनुषंगाने प्राप्त प्रस्तावांपैकी सुयोग्य प्रस्ताव निवडण्यासाठी सुकाणू समितीचे गठण करण्यात आलेले आहे. बैठकी दरम्यान सुकाणू समितीने घेतलेल्या निर्णयानुसार सुयोग्य प्रस्तावांना काही अटी व शर्तींच्या अधिन राहून निधी वितरीत करण्यात येतो. फ़ेरी ३ व ४ साठी घेण्यात आलेल्या बैठकी दरम्यान निवड झालेल्या जीवन आशा वेल्फ़ेअर सोसायटी, अमरावती यांनी अटीच्या पूर्तता न केल्याने सदर मंजूर प्रस्ताव रद्द करण्याचे शासन विचाराधीन होते.

**शासन निर्णय :**

पर्यावरण संवर्धनार्थ राज्याच्या स्थानिक गरजा लक्षात घेवून लोकसहभागातून नाविन्यपूर्ण कार्यक्रम राबविण्यासाठी मागविण्यात आलेल्या प्रस्तावांपैकी डिसेंबर, २०१० ते मे २०११ या कालावधीत प्राप्त प्रस्तावांपैकी सुकाणू समितीने दिनांक ७.७.२०११ रोजी आयोजित बैठकी दरम्यान घेतलेल्या निर्णयानुसार काही प्रस्तावांना सन २०११-१२ या आर्थिक वर्षात काही अटी व शर्तींच्या अनुषंगाने निधी मंजूर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर मंजूर प्रस्तावात पिण्याच्या पाण्याची उपलब्धता वाढविण्याच्या कार्यक्रमासाठी अमरावती जिल्ह्यातील अशासकीय संस्था जीवन आशा वेल्फ़ेअर सोसायटी, यांची निवड करण्यात आली होती. सदर कार्यक्रम राबविण्यासाठी सदर संस्थेस रु. ३.०० लाख एवढा निधी मंजूर करण्यात आला होता. सदर रक्कम मुक्त करण्यापूर्वी काही अटी व शर्ती पूर्ण करणे आवश्यक होते.

२. अशासकीय संस्था-जीवन आशा वेल्फ़ेअर सोसायटीच्या प्रस्तावित योजनेनुसार पिण्याच्या पाण्याची उपलब्धता वाढविण्यासाठी वरुड तालुक्यात हातपंप बसविण्याबाबत भूजल सर्वेक्षण विभागाने ६० मी पेक्षा जास्त खोलीची विंधन विहिरीसाठी परवानगी नाकारली असून त्याबाबत सदर संस्थेने दिनांक ७ डिसेंबर २०११ रोजीच्या पत्रानुसार विभागास प्रस्तावित योजनेतील पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेसाठी हातपंप बसविण्यास असमर्थता दर्शविली असून उर्वरित कामांसाठी रु. ५३, ८००/- एवढ्या निधीची मागणी केली आहे.

३.	उपरोक्त योजना पिण्याच्या पाण्याची उपलब्धता वाढविण्याच्या अनुषंगाने मंजूर करण्यात आली होती परंतु नव्याने प्रस्तावित कार्यक्रमाद्वारे पर्यावरण संवर्धन व संरक्षणाचा हेतू साध्य होत नसल्याने सदर संस्थेस मंजूर केलेली प्रस्तावित योजना व निधी या शासन निर्णयाद्वारे रद्द करण्यात येत आहे.

४.	सदर शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा सांकेतांक क्र. २०१२०२२३११४३०६२६००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या नावाने व आदेशानुसार,

(दे. के. मानकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत -

१.	संबधित जिल्हाधिकारी,
२.	संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
३.	सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
४.	मा. मंत्री यांचे स्वीय सहायक,
५.	मा. राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
६.	उप सचिव (वित्त विभाग/व्यय-१६) मंत्रालय, मुंबई
७.	उप सचिव (नियोजन विभाक/कार्या-१४६१), मंत्रालय, मुंबई
८.	सर्व उपसचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय
९.	महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरीक्षा) महा.१, महा-२, मुंबई/नागपूर
१०.	अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
११.	निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
१२.	संबंधित जिल्हा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
१३.	सचिव पर्यावरण यांचे स्वीय सहायक
१४.	संबंधित व्यक्ती / संस्था
१५.	निवड नस्ती / तां.क. ३